# वसंत देसाई - भाग २

एक वेळ अशी आली की प्रभात स्टुडिओने टेंबे यांच्यावर स्वतंत्रपणे संगीत देण्याची जबाबदारी सोपवली. तेव्हा त्यांनी वसंत देसाई यांना आपल्या पंखांखाली घेतले. प्रभातने १९३२ साली 'अयोध्येचा राजा' हा आपला पहिलाच बोलपट तयार केला आणि त्यामध्ये वसंत देसाई यांना गाण्याची प्रथम संधीही मिळाली. लवकरच वसंत देसाई यांनी मास्टर कृष्णराज आणि केशवराव भोळे यांच्या सोबत 'अमृत मंथन', 'दुनिया ना माने' आणि 'संत ज्ञानेश्वर' यांसारख्या बऱ्याच चित्रपटांना संगीत दिले. आता देखील ते उस्ताद इनायत खान यांच्याकडे शिकवणी घेतच होते. त्यासोबत ते उर्दूही शिकत होतेआणि त्यांनी डागर बंधूंकडून हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील धमार आणि धृपद यांचाही अभ्यास केला. ४०च्या दशकाच्या मध्याला ते 'ऑल इंडिया रेडिओ'च्या स्टुडिओमध्ये बरीच मागणी असणारा कलावंत म्हणून ओळखले जात असत.

मधल्या काळात प्रभात कंपनी बंद झाली. त्यामुळे ह्या संगीतकाराला मुंबईला यावे लागले. इकडे आल्यावर त्यांनी १९४२ च्या 'शोभा' चित्रपटात प्रथमच स्वतंत्र्यरित्या संगीत दिले. तसेच १९४३ च्या 'आँख की शरम' आणि 'मौज' या दोन्ही चित्रपटांनाही त्यांनी संगीत दिले. ह्याच सुमारास व्ही. शांताराम हे मुंबईत 'राजकमल स्टुडिओ' सुरू करत होते आणि 'शकुंतला' हा आपला पहिला चित्रपट बनवण्याच्या तयारीत होते. त्यांनी वसंत देसाई यांना बोलावून घेतले आणि या चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवून त्यांना एक मोठी नामी संधी दिली. ह्या चित्रपटात 'जीवनकी नाव ना डोले, हाँ ये है तेरे हवाले' हे गाणे अभिनेत्री जयश्री यांनी म्हटले आहे. ह्या चित्रपटाला प्रचंड यश मिळाले.



व्ही. शांताराम यांच्याबरोबरचा त्यांचा सहयोग बऱ्याच काळाचा होता आणि तो खूपच फलदायी ठरला. ह्या काळात त्यांनी 'शकुंतला', 'जीवनयात्रा', 'डॉ. कोटणीस की अमर कहानी', 'मतवाला शायर राम जोशी', 'अंधोंकी दुनिया', 'दहेज', 'झनक झनक पायल बाजे', 'तुफान और दिया' आणि 'दो आँखे बारा हाथ' यांसारखे सुरेख चित्रपट केले. हे सर्व रसिकमान्य चित्रपट म्हणजे वसंत देसाई यांची सर्वांत मोठी वाखाणण्यायोग्य 'प्रशंसनीय कलाकृती' म्हणता येईल. विशेष करून शेवटचे तीन चित्रपट अभूतपूर्व यश मिळवून गेले. ह्याचा अर्थ असा नव्हे की त्यांनी फक्त राजकमलचेच चित्रपट जीव ओतून केले. त्यांनी इतर बॅनर्सचे बरेच चित्रपटही उत्तमरित्या केले. त्यांनी जवळजवळ ५० हिंदी चित्रपट केले. त्यांतील गाण्यांसह त्या चित्रपटांची सूची पुढे दिलीही आहे. 'श्यामची आई', 'बाप माझा ब्रह्मचारी' यांसारखे सुमारे २० मराठी चित्रपटही केले. तसेच त्यांनी डझनभर नाटकांना संगीत दिले. अभिनयही केला, गाणी गायले, गाण्यांना चाली लावल्या आणि संगीत दिग्दर्शनही केले.

रागदारी संगीतावर आधारित चाली बांधण्यात त्यांचा हात कुणीही धरू शकला नसता. त्या क्षेत्रात ते अव्वल होतेच, तसेच हिंदी चित्रपटांतील कितीतरी गाणी त्यांनी वेगवेगळ्या रागांतून सुरेखच गुंफली होती. त्यांतील काही नावे पुढे दिलीही आहेत. सांगितिक दृष्ट्या उत्तम (खरं तर अत्युत्तम) असलेल्या 'गुँज उठी शहनाई' या चित्रपटातून त्यांनी आपल्याला अप्रतिम गाण्यांचा खजिनाच दिला असे म्हणायला हरकत नाही. ह्या चित्रपटातील गाण्यांत त्यांनी वापरलेल्या उस्ताद बिस्मिल्ला खान यांच्या सनईची रंगत काही औरच आहे. उस्ताद अब्दुल हालिम जाफर खान यांच्या सतारीचाही उठावदारपणे उपयोग केला आहे. तसेच सोबत शास्त्रीय संगीताचे दिग्गज गायक उस्ताद आमीर खान यांचा आवाजही भारावून टाकतो.

(क्रमशः)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”,

which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com